नियमित दावा नं.१३/२००८
शहाजी वि. सरकार

## निशाणी क्र.६८ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दावा कलम १–क व १–इ ची फेरमोजणी होण्यासाठी प्रकरण परत पाठविण्यासाठी दाखल केलेला आहे.

## अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे –

**२**. प्रस्तुत दाव्याच्या कामी वादीने निशाणी क्र.८ कडे दावा मिळकतीच्या मोजणीसाठी अर्ज दिला होता. तथापी दावा मिळकत १–क व १–इ मध्ये उंच पिके असल्यामुळे मोजणी न करता प्रकरण परत पाठवण्यात आले. त्यानंतर त्यांनी निशाणी क्र.४८ प्रमाणे फेरअर्ज दिला. तो न्यायालयाने मंजूर केला. त्यानंतर त्यांनी कमिशन फी जमा केली. कमिशनर यांनी दावा मिळकतीची मोजणी केली परंतु निशाणी क्र.४९ प्रमाणे अन्य मिळकतीचा अहवाल सादर केला. त्यांनी दाखल केलेल्या नकाशामध्ये दावा मिळकत १–क व १–इ चा आढळ होत नाही. म्हणजेच त्यांनी निशाणी क्र.८ व ४८ प्रमाणे मोजणी न करता अहवाल सादर केलेला आहे. त्यामुळे निशाणी क्र.८ व ४८ प्रमाणे मोजणी करण्यासाठी प्रकरण पुन्हा उपअधीक्षक भूमि अभिलेख यांच्याकडे पाठविण्यात यावे, अशी विनंती केली.

**३**. प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र.६९ प्रमाणे दाखल केले व अर्जातील सर्व कथने अमान्य केली. वादीने यापुर्वी दिनांक १७/०६/२०१७ व २२/११/२०१७ रोजी याच कारणासाठी अर्ज केले होते. ते रद्द झाले. त्याविरुध्द त्याने कोणतेही अपील केलेले नाही. त्यामुळे अर्ज कायद्याने चालु शकणार नाही. वादीचे अर्जाप्रमाणे अहवाल न्यायालयात दाखल झालेला आहे. त्यावरुन मोजणीदारास साक्षी समन्स काढण्यात आले व साक्षीदाराची वॉरंट बजावणीसाठी तारीख नेमली असता न्यायालयाची दिशाभुल करुन चुकीचा आदेश मिळविण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

४. पुरेसा अवधी देवूनही इतर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द विनाम्हणणे चालविण्यात आला.

५. वादीचे विद्वान विधीज्ञ श्री.भोसले यांनी युक्तीवाद केला की, मोजणीदाराने निशाणी क्र.८ व ४८ कडील आदेशाप्रमाणे मोजणी केलेली नाही. दाखल केलेल्या नकाशामध्ये मिळकतीचे नंबर नमुद नाहीत. केलेली मोजणी ही सदोष अशी आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज करणे भाग पडले.

६. याउलट प्रतिवादी क्र.३ व ४ चे विद्वान विधीज्ञ श्री.देव यांनी युक्तीवाद केला की, वादीने मोजणीसाठी निशाणी क्र.८ प्रमाणे अर्ज केला होता. त्याप्रमाणे मोजणी होवून निशाणी क्र.४९ प्रमाणे नकाशा दाखल झालेला आहे. तो त्यांना मान्य नसल्याने त्यांनी फेरमोजणीसाठी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. यापुर्वी वादीने दिनांक १७/०६/२०१७ व २२/११/२०१७ रोजी मोजणीसाठी अर्ज दिले होते व ते नामंजूर झालेले आहेत. त्याविरुध्द वादीने अपील केलेले नाही. त्यानंतर वादीने मोजणीदारास समन्स काढले होते. तो गैरहजर राहील्याने प्रकरण त्याचे वॉरंट बजावणीस असताना प्रस्तुतचा अर्ज प्रकरणाचे कामकाज लांबविण्यासाठी दाखल केलेला आहे. तो रद्द करण्यात यावा.

७. अर्ज वाचला. त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे वाचले. अभिलेख अवलोकीला. निशाणी क्र.८ कडील आदेशानुसार न्यायालयीन आयुक्तांना दावा मिळकतीची विशेषतः दावा मिळकत १–क व १–इ ची मोजणी करण्याबाबत निर्देश दिले होते. उंच पिके असल्यामुळे मोजणी करता आली नाही म्हणून वादीने निशाणी क्र.४८ कडील अर्ज दाखल केला होता. त्याप्रमाणे प्रकरण पुन्हा मोजणीसाठी पाठविण्यात आले. त्यावरुन मोजणीदाराने निशाणी क्र.४९ कडे अहवाल व नकाशा सादर केला. सदर नकाशाचे अवलोकन केले असता त्यामध्ये कोठेही वाद मिळकतीचा म्हणजेच वाद मिळकत १–क व १–इ चा आढळ होत असल्याचे दिसत नाही. यावरुन न्यायालयीन आयुक्ताने न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मोजणीचे काम केले नाही, असे सकृतदर्शनी दिसते. सबब, अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. तथापी

प्रकरण दहा वर्षापेक्षा जुने असल्याने सदर प्रकरणी तातडीची मोजणी होणे आवश्यक वाटते व मागितलेली मोजणी ही वादीने मागितली असल्याने त्याचा खर्च देखील त्यास करावयास लावणे उचित होईल. सबब आदेश.

:**<u>आदेश</u>**:

१. अर्ज निशाणी क्र.६८ विनंतीनुसार मंजूर करण्यात येतो.

२. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी दावा मिळकतीची विशेषतः वाद मिळकत १–क व १–इ ची तातडीची मोजणी करुन त्याचा अहवाल त्वरीत सादर करावा.

३. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांना असाही निर्देश देण्यात येतो की, त्यांनी कमिशनचे काम उभय पक्षकारांना व लगत कब्जेदारांना पुर्व सुचना देवून व त्यांचे विधीज्ञ यांना कळवून त्यांचे समक्ष करावे व तसा स्वयंस्पष्ट अहवाल नकाशासह या न्यायालयात त्वरीत सादर करावा.

४. वादी यांना निर्देश देण्यात येतो की, वाद मिळकतीची मोजणी करण्यासाठी ती मोजणीयोग्य करुन द्यावी.

५. वादी यांनी तातडीची मोजणी फी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्याकडे थेट भरावी.

६. वरील आदेशाची वादीने सात दिवसांचे आत पुर्तता न केल्यास सदरचा आदेश आपोआप रद्द होईल.

७. आदेशाची पुर्तता केल्यावर कमिशन रिट अदा करावे.

माळशिरस (र.सु.क्षीरसागर)
दिनांक ०८/०१/२०१९ दिवाणी न्यायाधीश व. स्तर
माळशिरस

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

(a) Name of the Stenographer : **S.S.Mitragotri**

(b) Court : **Civil Court Senior Division, Malshiras.**

(c) Judgment signed by P.O. on : **08.01.2019.**

(d) Judgment uploaded on : **19.01.2019.**